REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.7631(UIF)
UGC APPROVED JOURNAL NO. 48514
VOLUME - 8 | ISSUE - 9 | JUNE - 2019

# नंदुरबार जिल्ह्यातील आदिवासी समुहातील डाकिण प्रथेचा चिकित्सक अभ्यास ...

प्रा.डॉ. अनिल माणिक बैसाणे[1] , श्री. सुकेंद्र किसनराव वळवी[2]
[1]एम.ए., पीएच. डी., जयहिंद शैक्षणिक संस्थेचे झेड. बी. पाटील,कला व वाणिज्य महाविद्यालय, धुळे.
[2]संशोधन विदयार्थी ,प्राथमिक शिक्षक , जिल्हा परिषद केंद्र शाळा, बसरावळ ता.साक्री जि.धुळे

**प्रस्तावना :**



आदिवासी समाजात आजही काही स्त्री-पुरुषांवर डाकिणीचा संशय घेउन त्यांना मारहाण करणे, सामाजिक बहिष्कार टाकणे, डाकिणी समाजाला घातक आहेत. अशा श्रध्दा-अंधश्रध्देमुळे भगताकडून त्यांच्यावर अघोरी उपाय केले जातात. पुरुषही डाकिणी असल्याचा संशय असला तरी सामाजिक अवहेलनेच्या बळी मात्र बहुसंख्य स्त्रियाच ठरत असतात. डाकिणी असलेल्या स्त्रिया गुप्त विद्या प्राप्त करुन समाजातील मुला-बाळांना, स्त्री-पुरुषांना ठार मारतात. त्या रक्तपिपासु असतात, असा गैरसमज समाजात आहे. आजही डाकिणी वर्तनाच्या अनेक घटना अनुभवी व्यक्तींकडून कथन केल्या जातात. समाजविघातक डाकिणीची विधायक प्रतिविद्या भगताला अवगत असते. त्यामुळेच भगत शारीरिक व मानसिक रुग्णांवरील डाकिणीची बाधा दूर करतो. म्हणूनच आरोग्य देणाऱ्या भगताला सन्मान आणि समाजाला पीडा देणाऱ्या डाकिणीचा छळ केला जातो. वास्तविक आदिवासी समाजाचे हे वर्तन अवैज्ञानिकपणा, प्रागतिक जाणिवांचा अभाव हयामुळेच घडून येते. अशा अंधश्रद्धाळू बाबींमधून समाजाची मुक्तता करण्याकरिता ज्ञान-विज्ञानाची कास धरुन सर्वंकष जाणिवांनीयुक्त समाजाची उभारणी करणे. आज काळाची गरज आहे.

**डाकिणी घातक कुप्रथा :**

आदिवासी भागात अनेक प्रथा-परंपरा व धार्मिक संकल्पना ह्या आदिवासीच्या जगण्याचा एक भाग आहे. शेकडो वर्षापासून आदिवासी समुदाय ह्या प्रथा-परंपरा व धार्मिक विधी पारंपारीक पध्दतीने करीत आलेला आहे. जादूटोणा, करणी, किंवा मंत्र-तंत्र या गुप्त विद्या आत्मसात करुन स्त्रिया चेटकीण बनतात असा समज जिल्ह्यातील आदिवासी समुहाचा आहे. गुप्त विद्येच्या सामर्थ्यामुळे भूताखेतावर प्रभाव निर्माण करुन आपली मनोकामना साध्य करणाऱ्या महिलांना डाकिणी म्हणून संबोधले जाते.[1] डाकीणीस जखीण, हडळ, डगरी, चेटकीण, भुताळी हया नावांनी देखील ओळखले जाते. आदिवासी समाजात स्त्री-पुरुष दोघांमध्ये डाकिणीचा संचार असल्याचे सांगितले जाते. असे असले तरी विशेषत: स्त्रियांवरच डाकिणी असल्याचा संशय वेळोवेळी घेतला जातो. यासंदर्भामध्ये आपणास अनेक उदाहरणे ऐकीवात किंवा वाचावयास मिळतात. नंदुरबार जिल्ह्यातल्या मांडवी खुर्द गावात कैलीबाई पटले या आदिवासी स्त्रीला डाकीण ठरवून ठार मारण्यात आले आहे. तर अक्कलकुवा तालुक्यातील वेरी हया गावात तीन वेगवेगळ्या घटनांमध्ये डाकिणी प्रथेच्या अनुषंगाने काही व्यक्तींचा मृत्यु झाला. अशी गावांत ऐकीवात आहे. हयात गावातील मोहत्या वसावे ह्यांच्या कुटुंबावर डाकिणीचा संशय घेण्यात आलेला होता. त्यामुळे त्यास मारहाण करुन त्याच्या कुटुंबातील भरत वसावे ह्यांना पंचासमोर विष पाजून मारण्याचा प्रयत्न झाला होता. परिणामी मोहत्या वसावे हयांच्या कुटुंबाने दुसऱ्या गावात आश्रय घेतला. परंतू तेथेही त्यांना तोच त्रास जाणवल्यामुळे मुळगावी परतावे लागले.[2] डाकिणीच्या संशयावरुन

अक्कलकुवा तालुक्यातील उमरकुवा येथील महिलेला बेदम मारहाण करण्यात आली होती. हया घटनेत पीडीत महिलेचा हात मोडला होता.[३] कुंभारपाडा या गावात डाकिण ठरविल्या गेलेल्या कारणावरुन एका आदिवासी स्त्रीला मीठाला हात लावण्यास (आदिवासी समुहातील दिव्य) सांगण्यात आलेले होते.[४] अश्या प्रकारचे काही दिव्य डाकिण ठरविले गेलेल्या स्त्रियांना आदिवासी समूह किंवा गाव पंचायत करण्यास सक्ती करत असते.

## डाकिणी संदर्भात आदिवासी समूहात असलेले समज-गैरसमज :-

डाकिणी समजल्या जाणाऱ्या स्त्रिया किंवा पुरुष कालीमातेची पूजा करुन अघोरी विद्या संपादन करण्याकरीता गावातील किंवा स्वत:च्या मुलाचा बळी देतात, असा गैरसमज आदिवासी समूहात आहे. एखाद्या व्यक्तीवर डाकिणी स्वत:च्या विद्येचा प्रयोग करण्याआधी नदीवर, विहीरीवर, पाणवठ्यावर आंघोळीस जातात, असाही समज आहे. अशा वेळेस त्यांना कोणी पाहिल्यास किंवा डाकिण असलेल्या स्त्रीच्या केसातील पाणी अंगावर पडल्यास ती व्यक्ती दीर्घ आजारी पडते किंवा वेडसर होते, असा समज नंदुरबार जिल्ह्यातील आदिवासी समूहात आहे. डाकिण विद्येने बाधीत झालेली व्यक्ती निळसर होवून गळफास घेते, दीर्घ आजाराने किंवा रक्ताच्या उलट्या होवून मरण पावते.[५] अशा अंधश्रद्धा आदिवासी समूहात प्रचलित आहेत. डाकिणी रक्तावर जिवंत राहतात. मानवाचे रक्त पिऊन त्या अधिक सुदृढ आणि सशक्त दिसतात. मानवी बळी घेतल्यामुळे डाकिणीची विद्या अधिकच बळकट होते, असा समज आहे. डाकिणीबद्दल सर्व सामान्य माणूस चर्चा करीत नाही. चार चौघात डाकिणी बद्दल चर्चा करीत असतांना जर डाकिण असलेल्या व्यक्तीने हे संभाषण ऐकल्यास डाकिण संभाषण करणाऱ्या व्यक्तींना वेळी-अवेळी अपाय पोहोचविते, असा समज आदिवासी समूहात आहे.

## डाकिणीची विद्या :

नवीन डाकिण विद्या शिकणारी स्त्री किंवा पुरुष हे पक्की विद्या शिकलेल्या व्यक्तीकडे वर्षभर शिक्षण घेतात. डाकिण असलेली व्यक्तीची विद्या प्रभावीत ठेवण्यासाठी नरबळीची आवश्यकता असते. योग्य वेळेस नियोजीत व्यक्तीचा बळी न घेता आल्यास, स्वत:च्या कुटुंबातील मुला-मुलीचाच बळी घेतला जातो. अशा प्रकाराची अंधश्रद्धा आदिवासी समूहात आहे. गावात डाकिण किंवा भगत एकमेकाच्या विद्या आणि शक्ती ओळखून असतात. एकमेकाकडे किती विद्या आहे, हे गावातील सूख-दुखा:च्या विविध प्रसंगातून जाणून असतात. डाकिणीची विद्या सहसा भगताच्या विद्येपेक्षा कमीच असते, भगताची विद्या श्रेष्ठ ठरत असल्यास अशा वेळेस गावातील अनेक डाकिणी त्यांचा समूह बनवून भगताच्या विद्येचा प्रतिकार करतात. गावात जर डाकिण भगतापेक्षा श्रेष्ठ ठरत असेल तर तो भगत सहसा रात्री फिरत नाही कारण त्याला डाकिणीचा धोका अधिक असतो. पक्की विद्या प्राप्त झालेली डाकिण किंवा डाकिणीचा समूह एखाद्या व्यक्तीच्या किंवा भगताला मारुन टाकण्याचे ठरविल्यास त्याचा पिछा सोडत नाही. अशा वेळेस भगत एखाद्या निर्जन स्थळी किंवा दुसऱ्या गावात राहण्यास निघून जातो. अन्यत: त्याच्या गुरुकडे जाऊन भगताईचे जास्तीचे शिक्षण घेऊन परत येतो. डाकिणींना मारुन, जमीनीत खोलवर पुरुन देवाधिकांच्या नावाने विधी केला जातो. अशा घटना व विधी साक्री तालुक्यातील मादलीपाडा या गावात घडलेल्या आहेत.[६]

### १. मूठ मारणे :

आदिवासी समाजात डाकिणीच्या जादू विद्येवर विश्वास आहे. डाकिणी ह्या मंत्र-तंत्राच्या जोरावर मूठ मारुन व्यक्तींना ठार करु शकतात. डाकिण विद्या शिकलेली व्यक्ती नियोजीत शत्रू व्यक्तीच्या दिशेने मंत्राधीष्ठित शक्तींनी भारलेली मूठ फेकतात.[७] अशी नियोजीत व्यक्ती सामूहिक कार्यक्रमात किंवा कितीही दूर असली तरी त्या व्यक्तीला मूठ मारुन ठार करण्यात येते. बहुतेक वेळेस ह्या मूठ मारण्याच्या विधीमुळे व्यक्ती मरत नाही मात्र त्यास शारीरीक इजा होत असते. रायंगण ह्या गावातील गावीत आदिवासी समुहात ५० वर्षीय व्यक्तीने डाकिणीस हटकल्यामुळे त्यास मूठ मारुन आजारी पाडले होते.[८] असा प्रचार रांयगण गावात सर्वत्र करण्यात आला होता.

### २. तोंडावाटे रक्त पाडून ठार मारणे :

डाकिणी मार्फत विधी करुन निश्चित केलेल्या व्यक्तीच्या पिठाची किंवा कापडाची छोटीशी प्रतिकृती तयार करुन त्यावर सुया टोचून त्यास आजारी पाडले जाते किंवा तोंडावाटे रक्त पाडून मारुन टाकले जाते. उमराण येथील शंकर नुरा वळवी ह्या व्यक्तीस अशाच रितीने डाकिणीने विधी करुन तोंडावाटे रक्त पाडून मारुन टाकले होते.[९] अशी उमराण गावांत ऐकीवात आहे.

### ३. केसांवर, कपड्यांवर, अन्नातून, चहातून डाकीण प्रयोग करुन मारणे :

एखाद्या व्यक्तीवर अघोरी विद्या करावयाची असल्यास त्या व्यक्तीच्या सावलीवर पाय ठेवून मंत्र म्हणणे किंवा त्या व्यक्तीच्या केसांवर, कपड्यांवर विधी करणे, अन्नातून किंवा चहातून डाकीणी विद्येचे प्रयोग करण्यात येतात. असे प्रयोग डाकिणी विद्येमध्ये येतात.[१०]

### ४. डाकिणीचे प्राण्यात रुंपातर :

डाकिण विद्येचे प्रयोग करण्याआधी डाकिणी अमावश्येच्या रात्री मारुतीच्या देवळासमोर जाऊन परवानगी घेत असतात. अशी परवानगी घेण्यासाठी रात्री मांजर, घुबड, कुत्रा इत्यादिचे पशु-पक्षींचे रुप घेऊन देवळात किंवा देवळाच्या परीसरात प्रवेश करतात. डाकीण असलेल्या व्यक्तीस शिवीगाळ केल्यास ती घाबरुन पळून जाते किंवा अनावधानाने चिडून न करावयाची कृती करते. डाकिण असलेली व्यक्ती मात्र इतरवेळी समाजात सामान्य व्यक्ती प्रमाणेच वर्तन करीत असते.

### डाकिण संदर्भात भगताच्या अविष्कार पद्धती :-

डाकिणी जवळ असलेली विद्या भगताकडे देखील असते. परंतु भगत त्या विद्येचा वापर लोक कल्याणासाठी करीत असतो. भगताने त्याच विद्येचा वापर इतरांना अपाय करण्यासाठी केल्यास तो देखील डाकिण ठरतो. आदिवासी समाजातील एखाद्या व्यक्तीला अचानक छातीत कळ आल्यास, मानसिक दुर्बल्य आल्यास किंवा ती व्यक्ती वेडसरपणे वागत असल्यास त्याला उपचाराकरीता भगताकडे नेतात. भगताच्या अंगात वारे येऊन तो घुमु लागतो आणि संशयीत व्यक्तीकडे अंगुली निर्देश करुन दिशा दाखवितो. सदर व्यक्तीने ही करणी केलेली आहे, असे सांगतो. डाकिणीने केलेल्या विधीवर प्रतिविधी म्हणून भगत उपाययोजनात्मक कृती करुन डाकिणीची विद्या नष्ट करीत असतो. उदाहरणार्थ- एखाद्या व्यक्तीच्या अंगावर डाकिणीच्या आंघोळीनंतरचे केसातले पाणी पडल्यास ती व्यक्ती वेडसरपणे वागते. त्या व्यक्तीला भगताकडे नेल्यास भगत त्याच्याकडे असलेले मंत्राधिष्ठीत पाणी बाधीत व्यक्तीच्या डोक्यावर शिपंडून काही मंत्र म्हणून हाताला पंचरंगी दोरा बंधन म्हणून बांधतो. काही पथ्यपालनही करण्यास सांगतो. असाच एक भगत विद्येचा जाणकार साक्री तालुक्यातील वार्सा येथील कुशन्या भगत म्हणून प्रसिद्ध होता. कुशन्या भगतामार्फत नवापूर तालुक्यातील डाकिण विद्येने बाधित झालेल्या व्यक्तींवर उपाययोजना केल्या जात.[११] डाकिणीला किंवा डगरी, भुताळी यांना गावाच्या बाहेर काढावयाचे झाल्यास संपूर्ण गावाचा एकमताने ठराव करुन घ्यावा लागतो. तरच त्या व्यक्तीला गावाबाहेर काढले जाते. त्यासाठी गाव पंचायत बोलविली जाते. अश्या प्रकारच्या गाव पंचायती नवापूर तालुक्यातील खोकसा, नागझरी, सरी ह्या गावात घेतल्या गेलेल्या आहेत. डाकिणीवर उपाय योजना म्हणून डाकिण ठरविलेल्या व्यक्तीला मारझोड करणे, धिंड काढणे, एरंडीच्या काठीने मारणे (एरंडीच्या काठीनेच डाकिणीला मार लागतो म्हणून) अशा उपाय योजना करुन त्याने किंवा तिने केलेली करणी परत घेऊन टाकण्यास किंवा सुधरविण्यास भाग पाडले जाते. अशा प्रकारच्या उपाययोजनांमुळे निरापराध लोक बळी पडतात. वस्ती सोडून अन्यत्र पळून जावे लागते. भगताकडून अनेक स्त्रीयांना डाकिण ठरवले जाते. अशा स्त्रियांना गावाबाहेर हाकलून देण्यात येते. समाज डाकिण ठरवलेल्या व्यक्तीशी व त्या कुटुंबांशी समाज संबंध ठेवत नाहीत.[१२] आदिवासी समाज आजही ह्या क्रूर प्रथा-परंपरांना वैज्ञानिकतेच्या कसोटीवर तपासून पहायला तयार नाही. अशा अनेक प्रथा-परंपरा समाज आजही अंधश्रद्धाळू वृत्तीने जोपासताना दिसतो. त्याचाच एक भाग डाकिण प्रथा आहे. एखाद्या स्त्रीला डाकिण ठरवून तिला उपद्रव देणे, तिचा छळ करणे, अवहेलना करणारी व्यक्ती कायद्याने गुन्हेगार ठरते, अशा व्यक्तिविरुद्ध अनिष्ट, अघोरी प्रथा व जादूटोणा प्रतिबंध उच्चाटन कायदा २०१३ नुसार गुन्हा दाखल करता येतो.

डाकीण प्रथेसंदर्भात प्रबोधन करण्यासाठी महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मुलन समितीच्या कार्यकर्त्यांनी स्थानिक आदिवासी कार्यकर्ते व शिक्षकांना जमवून डिसेंबर २००३ मध्ये नंदुरबार शहारात डाकिण प्रथाविरोधी पोलीस पाटील परिषद, युवती संवादयात्रा, यासारख्या प्रबोधनपर कार्यक्रमांचे आयोजन केले होते. ह्या परिषदेमध्ये वेगवेगळ्या गावातील डाकिण ठरवलेल्या महीलांनाही बोलवण्यात आले होते. अंधश्रद्धा निर्मुलन करण्यासाठी तालुक्यातील गावांमध्ये जनजागृती कार्यक्रम, जादूटोणा विरोधी कायद्याच्या प्रबोधनासाठी पोलीस पाटीलांचे प्रशिक्षण अंधश्रद्धा निर्मूलन समिती व पोलीस प्रशासनाच्या वतीने घेतले होते. असे असतानाही आजही महाराष्ट्रातील अनेक आदिवासी भागात स्त्रियांना डाकिण ठरविले जाऊन त्यांचे जगणे असहाय्य केले जाते परंतू गुन्ह्याची नोंद केली जात नाही.[१३] असे परखड मत दाभोळकरांनी व्यक्त केले आहे.

### निष्कर्ष :-

आदिवासी समाजात शिक्षणाचे प्रमाण नगण्य असल्यामुळे, वैज्ञानिक बोध स्पष्ट होत नाहीत. म्हणूनच कोणत्याही शारीरिक, मानसिक आजारांवर पारंपारिक उपचार पद्धतीचाच स्वीकार केला जातो. हयाचाच फायदा भगत घेत असतात.

भगताला आजारासंबंधी शास्त्रीय आकलन होत नसल्याने त्या व्यक्तीवर डाकिणीचा प्रभाव आहे किंवा तंत्रविद्येने प्रभावित झाल्याचा भ्रम निर्माण करतो. अनेक वेळा आदिवासी समाजात व्यक्तिगत भांडणामुळे देखील एकमेकावर डाकिणी असल्याचे आरोप केले जातात. एखादी व्यक्ती आजारी पडल्यास, विरुद्ध पक्षातील व्यक्तींनी डाकिणीसारखे वाईट कृत्य केल्याचा आरोप एकमेंकावर करण्यात येतात. त्यातूनच आदिवासी समाजात डाकिणी ही कुप्रथा रुढ झालेली पहावयास मिळते. डाकीणी संदर्भात प्रत्यक्षात काही गावांमध्ये चोरी करतांना चोर पकडले गेल्यास किंवा पकडले जाणार आहोत अशी जाणीव झाल्यास, चोर विचित्र कृती करुन लोकांना घाबरवतात. अशा व्यक्तींना लोक डाकिणी समजून घाबरत. डाकिणी असलेल्या स्त्री-पुरुषांच्या संपर्कात कोणीही जात नाहीत. असे असले तरी एखादी स्त्री किंवा पुरुष डाकिणी असल्याच्या घटनांना कोणताही शास्त्रीय आधार नाही किंवा कोणत्याही ठोस निकषावर डाकिणी असल्याचे सिद्ध झालेले नाही. केवळ अज्ञान, परंपरागत अनिष्ठ प्रथा, आपआपसातील संघर्ष-हेवेदावे, अंधश्रद्धाळू वृत्ती अशा अवैज्ञानिक वर्तनातूनच डाकिणी प्रथांवर विश्वास ठेवला जातो. आज आदिवासी समाजात शिक्षणाचे प्रमाण वाढले आहे. समाजात डॉक्टर, इंजिनियर, शिक्षक, लेखक, विचारवंत, साहित्यिकांचाही वर्ग कार्यरत आहे. वैज्ञानिक जाणिवा, अंधश्रद्धा निर्मूलन, जाणिवांपूर्ण शिक्षण यातून प्रबोधनात्मक वाटचाल होती असली तरी डाकिणीसारखी क्रूर प्रथा पूर्णतेने समाजातून हद्दपार झालेली नाही, असे मोठ्या धाडसाने नोंदवावे लागते. याकरिता सर्वंकष जाणिवांनी युक्त असा समाज निर्माण करणे अत्यावश्यक आहे. अशा प्रागतिक वाटचालीतून डाकिणीसारख्या क्रूर-अनिष्ट प्रथेचा शेवट करुन आदिवासी महिलांची अवहेलना थांबविता येईल असा आत्मविश्वास वाटतो.

## संदर्भ :


**१.** बैसाणे डॉ. अनिल माणिकराव, ***मराठाकालीन महाराष्ट्रातील समाज जीवन आणि अंधश्रद्धा,*** सम्यकता प्रकाशन, धुळे, २०१७, पृ. १४४.

**२.** ***Zee News India.com***, झी २४ तास Date - १२ मे २०१२

**३.** ***दैनिक लोकमत न्युज नेटवर्क*** १२ फेब्रुवारी २०१९, पृ.

**४.** ***मुलाखत - श्री. सत्यानंद अर्जुन गावीत*** रा. वडसत्रा, दि. १२.११.२०१६

**५.** ***मराठे समीर, समाविष्ट - दै. लोकमत, मंथन पुरवणी, आवृत्ती***- दिनांक १९ ऑगस्ट २०१२ रविवार पान. क्रं ३

**६.** ***मुलाखत - श्री. सुनिल मिराजी राऊत,*** मादलीपाडा ता. साक्री दि. १२.६.२०१६

**७.** ***पूर्वोक्त क्र.१***, पृ. १४३

**८.** ***मुलाखत, - श्री. हॉबेल जोलू गावीत,*** रा. रायंगण ता. नवापूर जि. नंदुरबार दि. १४.०२.२०१६

**९.** ***मुलाखत, श्री. महेश शांता वळवी,*** रा. धायटे ता. नवापूर दि. १९.०२.२०१६

**१०.** ***मुलाखत, श्री. दिलीप धनजी गावीत,*** रा. उंबर्डी ता. नवापूर जि. नंदुरबार दिनांक २०.३.२०१८

**११.** ***पूर्वोक्त, क्र.६*** दि. १२.६.२०१६

**१२.** पटले डॉ. भरतसिंग, ***परिवर्तनीय आदिवासी पावरा समाज,*** अथर्व प्रकाशन, धुळे, सन, पृ. ८८ /८९

१३. ***दैनिक लोकमत,*** दाभोळकर डॉ. नरेंद्र जादूटोणा विरोधी कायदा दिनांक १७.१२.२०१२, पृ. ४.